नदीजोड प्रकल्पाबाबत शासनाचे तांत्रिक सल्लागार म्हणून श्री. व्हि. डी. पाटील, सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांची नेमणूक करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/(१०७/२०१९)/जसंअ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०२ ऑगस्ट, २०१९

प्रस्तावना :

एकात्मिक राज्य जल आराखडयामध्ये राज्यातील विविध विपुलतेच्या खोऱ्यातून तुटीच्या खोऱ्यात अतिरिक्त पाणी वळविण्यासाठी विविध नदीजोड प्रकल्प/वळण योजना प्रस्तावित आहे. उपरोक्त योजनापैकी तुटीच्या तापी खोऱ्यात, गोदावरी खोऱ्यात पाण्याची टंचाई पाहता विपुलतेच्या पश्चिम वाहिनी (कोकण) खोऱ्यातून पाणी वळविण्यासाठीच्या वळण योजना तातडीने घेणे आवश्यक आहे. यापैकी अनेक योजनांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम राष्ट्रीय जलविकास अभिकरण, नवी दिल्ली तसेच वॅपकॉस, नवी दिल्ली या केन्द्र शासन अंगीकृत संस्थामार्फत हाती घेण्यात आले आहे.

राज्याअंतर्गत नदीजोड योजना/वळण योजना टप्प्या टप्प्याने हाती घेण्यासाठी सदर योजनांचे प्राधान्यक्रम निश्चित होणे आवश्यक आहे. प्राधान्यक्रम ठरविणेसाठी प्रवाही तसेच उपसा वळण योजनांचे मापदंड तयार करणे, सदर योजनांच्या विविध तांत्रिक बाबी ठरविणे, नियोजन करणे इत्यादी संदर्भात शासनास सल्ला देण्यासाठी तसेच या संदर्भात नेमण्यात आलेल्या विविध तज्ञ समितीत विशेष निमंत्रित म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करण्यासाठी शासनाने तांत्रिक सल्लागार म्हणून या संदर्भात अनुभवी व तज्ञ निवृत्त अधिकारी यांची नेमणूक करणेची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

श्री. व्हि.डी.पाटील, सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता, जळगाव यांना तापी, गोदावरी व कोकण खोऱ्यातील विविध नदीजोड प्रकल्पाच्या नियोजनाचा प्रदीर्घ अनुभव व याबाबतचा सखोल अभ्यास असून त्यांची नेमणूक झाल्यास शासनास विविध नदीजोड प्रकल्पाबाबत तांत्रिक निर्णय घेतांना मोठी मदत होईल. उपरोक्त सर्व बाबी पाहता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहे.

<u>शासन निर्णय :</u>

१. राज्याअंतर्गत विविध नदीजोड प्रकल्प/वळण योजनांच्या नियोजन तसेच विविध तांत्रिक बाबीवर शासनास मार्गदर्शन व सल्ला देण्यासाठी श्री.व्ही.डी.पाटील, सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता, जळगाव यांची या शासन निर्णयाच्या तारखेपासुन (दि.२.८.२०१९ पासून) एक वर्षापर्यंत शासनाचे तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

२. सल्लागारांना शासन निर्देश देईल त्या त्या वेळेस नदीजोड प्रकल्पाबाबत विविध बैठकीत शासनास सल्ला देण्यासाठी उपस्थित राहावे लागेल.

३. नदीजोड प्रकल्पाबाबत गठित विविध तज्ञ समितीच्या बैठकीत विशेष निमंत्रित शासनाचे सल्लागार म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करावे लागेल.

४. श्री.व्हि.डी.पाटील, तांत्रिक सल्लागार यांचे मानधन व इतर भत्तेबाबत स्वतंत्रपणे आदेश काढण्यात येतील.

५. उपरोक्त नमूद बैठकीत उपस्थित राहण्यासाठी वाहन व इतर आवश्यक व्यवस्था तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांनी करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१९०८०२१७१४०१६४२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Rajnish Ramkishor Shukla

Digitally signed by Rajnish Ramkishor Shukla
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d37cbfb080a0bc996a710b3c0aeea737985dac09cb66bbff878f42ad4e77a606, cn=Rajnish Ramkishor Shukla
Date: 2019.08.02 17:23:20 +05'30'

(र.रा.शुक्ला)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. मा. राज्यमंत्री, जलसंपदा यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्ष नेते विधानसभा व विधानपरिषद
६. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (जसं), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. सचिव (प्रकल्प व समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

१०.सचिव, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई
११.महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षा, नाशिक
१२. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे
१९. कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
२०. कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
२१.कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव
२२. कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
२३. श्री.व्ही.डी.पाटील, सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता, जळगाव तथा तांत्रिक सल्लागार, नदीजोड प्रकल्प, पळसखेडे बीके, पो. व ता. जामनेर जि. जळगाव (vasantdpatil60@gmail.com)
२४. मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान प्रकल्प, नाशिक
२५. सर्व सहसचिव/उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२६. जसंअ कार्यासन संग्रहार्थ